MHSN120001312025

**दाखल दिनांक – १३.०२.२०२५**

**नोंदणी दिनांक – १३.०२.२०२५**

**निकाल दिनांक – २७.०३.२०२६**

**कालावधी – ०१ वर्ष, ०१ महिना, १४ दिवस.**

**पलूस येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांचे न्यायालयात**

**(पिठासीन अधिकारी – एम.ए.एम.जे. शेख)**

**नियमित फौजदारी खटला क्र.२२/२०२५**

**नि.क्र.**

**अभियोग पक्ष** **महाराष्ट्र सरकार** तर्फे – पोलीस निरीक्षक,
**पलूस पोलीस ठाणे.**

**अभियोग पक्षातर्फे** श्री.आर.आर. चांगण, सहा. सरकारी अभियोक्ता.

विरूध्द

**आरोपी** **१. शुभम रामचंद्र मोहिते,**
वय – २८ वर्षे, धंदा – नोकरी,
**२. रामचंद्र विष्णु मोहिते,**
वय – ५७ वर्षे, धंदा – सुखवस्तु,
**३. सौ.वंदना रामचंद्र मोहिते,**
वय – ४८ वर्षे, धंदा – घरकाम,
सर्व रा.म्हाडा कॉलनी, ता.पलूस, जि.सांगली.

**आरोपींतर्फे वकील** श्री.व्ही.बी. कुंभार.

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडलेचा दिनांक | | सप्टेंबर–२०२३ ते दि.०९.११.२०२४ पर्यंत वेळोवेळी |
| गुन्हा रजिस्टर क्रमांक | | २२०/२०२४ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | | १३.०२.२०२५ |

| | | |
|---|---|---|
| दोषारोपपत्र न्यायालयात दाखल दिनांक | | १३.०२.२०२५ |
| साक्षीपुरावा सुरु झालेचा दिनांक | | ११.०७.२०२५ |
| युक्तिवाद दिनांक | | २७.०३.२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | | २७.०३.२०२६ |
| दोषसिध्दी व शिक्षेबाबत आदेश | | निर्दोष मुक्तता. |

## आरोपीची माहिती

| अनु– क्रमांक | आरोपीचे नांव | आरोपीस अटक दिनांक | आरोपीस जामिनावर खुले केलेचा दिनांक | दोषारोपा– तील कलम | आरोपीस दोषमुक्त किंवा दोषसिध्द केले | आरोपीस झालेली शिक्षा | भा.ना.सु.सं. क.४६८ नुसार आरोपीने संपरिक्षे दरम्यान भोगलेली शिक्षा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १.<br><br>२.<br><br>३. | शुभम रामचंद्र मोहिते,<br><br>रामचंद्र विष्णु मोहिते,<br><br>सौ.वंदना रामचंद्र मोहिते, | १२.११.२०२४ | --- | भा.न्या.सं. क. ८५, ११७(२), प्रमाणे | निर्दोष मुक्तता | --- | --- |

**अभियोग पक्षातर्फे घेतलेल्या साक्षीदाराची यादी**

| अ.क्र. | साक्षीदाराचे नांव | निशाणी क्र. | साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १ | विनया शुभम मोहिते | २७ | फिर्यादी |

**अभियोग पक्षातर्फे सिध्द केलेले दस्तऐवज**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| १. | नि.२८ व २९ | वर्दीजबाब व प्रथम खबर अहवालावरील सहीपुरती निशाणी |
| २. | नि.३१ | जखमी फिर्यादीचे वैद्यकीय प्रमाणपत्र आरोपीतर्फे मान्य करण्यात आला. |

**– न्यायनिर्णय –**

**(घोषणा तारीख– २७.०३.२०२६)**

प्रस्तूतचा खटला आरोपींविरुध्द भा.न्या.संहिता, ८५, ११७(२) प्रमाणे या अपराधांसाठी चालविण्यात आला.

२. **अभियोग पक्षाची थोडक्यात हकिकत अशी की,**

फिर्यादी विनया शुभम मोहिते हिने दि.०९.११.२०२४ रोजी फिर्याद देवून असे कथन केले की, आरोपी शुभम याचेसोबत दि.१५.०५.२०२३ रोजी रितीरिवाजाप्रमाणे लग्न झाले असून लग्नामध्ये संसार उपयोगी वस्तु देण्यात आले होते. लग्नानंतर सुरुवातीस तीन महिने आरोपींनी व्यवस्थित नांदविले व त्यानंतर तिची सासु तिला वारंवार 'तुझ्या आईने काही शिकवले नाही, तुला काय काम येत नाही, तु दोन टाईम फक्त खायच काम करते आणि झोपते, सकाळी लवकर उठत नाही' असे म्हणत होती. तसेच, फिर्यादी घरातील कामे वेळेवर करु लागली त्यावेळेस तिची सासु 'तु लय कामाची झाली आहेस, तुला कारभारीन व्हायची आहे' असे म्हणून सर्व आरोपी घरातील कामाच्या कारणावरुन त्रास देत होते त्यामुळे तिने तिच्या आईवडिलांना फोन करुन माहेरी गेली असता आरोपी व

फिर्यादी यांच्या नातेवाईकांमध्ये बैठक झाली होती त्यावेळेस त्यांच्यामध्ये एकमेकांसोबत भांडायचे नाही असे कबुल झाले होते त्यानंतर ती तिच्या पतीसोबत पुणे येथे राहणेस गेली असता तिचा पती तिला शिवीगाळ करुन मारहाण करीत होता त्यानंतर जानेवारी–२०२४ मध्ये तिच्या पतीने तिला कराड येथे घेवून आला व त्यानंतर तिच्या माहेरी सोडले.

३. जानेवारी–२०२४ मध्ये फिर्यादीचा मामा नंदकुमार हवालदार यांच्या मध्यस्थीने बैठक घेतली होती त्यावेळेस आरोपींनी मारहाण न करण्याच्या अटीवर सासरी घेवून गेले होते. त्यानंतर फिर्यादीस थॅायरॉईडचा त्रास झाल्याने तिच्या आईवडिलांनी तिला तिच्या माहेरी घेवून गेले होते व तेथे सहा महिने उपचार घेतला होता त्यानंतर आरोपींनी तिच्या आईवडिलांना फोन करुन 'तुमच्या मुलीला त्रास आहे, तुम्ही आमची फसवणुक केली आहे, तुमच्या मुलीला तिकडेच ठेवा' असे म्हणु लागले. त्यावेळेस फिर्यादीचे आईवडिल व तिच्या मामाने दिवाळी सणाच्या अगोदर बैठक घेवून आरोपींना समजावून तिला दि.२०.१०.२०२४ रोजी तिचे सासरी पलूस येथे आणून सोडले होते.

४. दि.०८.११.२०२४ रोजी १२–०० वाजताच्या सुमारास गंगा पुजन असल्याने पुजा झाल्यानंतर ब्राम्हणाने शिधा मागितली त्यावेळी फिर्यादी शिधा काढत असताना तिच्या सासुने फिर्यादीस 'मी शिधा देणार, तु देवू नकोस' असे सांगितले. त्यावेळेस तिने तिच्या सासुला 'तुम्ही जेवण करुन निवांत बसा, मी कामे करते' असे सांगितले असता तिने 'मी काय म्हातारी आहे का असे सांगून तिच्या पाठीवर डाळीची पिशवी मारली' म्हणून तिने त्यांचा हात धरुन तिला का मारले असे विचारले असता तिने 'तु कारभारीण झाली आहेस काय' असे सांगून शिवीगाळ केली व तिच्या डाव्या हाताच्या अंगठ्याला चावा घेतला त्यावेळेस तिच्या पतीने मुस्काट्या मारुन लाथाबुक्क्यांनी मारहाण केली व त्यानंतर तिच्या सास–याने तिचा मामा नंदकुमार यास फोन करुन बोलावून घेतले व फिर्यादीस तिच्या माहेरी पाठवून

दिले. आरोपींनी फिर्यादीस मारहाण केली, शारिरीक व मानसिक छळ केला म्हणून तिने आरोपीविरोधात म्हणून फिर्यादीने प्रस्तुतची फिर्याद दाखल केली.

**५.** सदरची फिर्याद गुन्हा रजिस्टर नंबर २२०/२०२४ ने नोंदविली व सदर गुन्ह्याचा तपास तपासी अधिकारी यांनी करुन तपास पूर्ण झाल्यानंतर न्यायालयात आरोपींविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

**६.** आरोपींवर भा.न्या.सं. कलम ८५, ११७(२) सह ३(५) अन्वये दोषारोप (निशाणी क्र.२०) ठेवून तो त्यांना वाचून दाखवला असता त्यांनी त्यांचेवरील सर्व आरोप नाकारले व सुनावणीस सामोरे जाण्याची तयारी दर्शवली आहे. सुनावणी दरम्यान फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये तडजोड झालेबाबत संयुक्तिक तडजोड पुरसिस (निशाणी क्र.२६) दिली आहे. तसेच, फिर्यादीतर्फे पुरावा संपल्याबाबत पुरसिस (निशाणी क्र.३०) दिली आहे. सबब, अभिलेखावर आरोपींविरुध्द कोणताही गुन्हादर्शक पुरावा न आल्यामुळे आरोपींचे भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ३५१ प्रमाणे निवेदन वगळण्यात आले.

**७.** सन्माननीय सरकारी अभियोक्ता व आरोपींतर्फे सन्माननीय वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे बारकाईने अवलोकन केले.

**८.** अभिलेख, पुरावे व उभयबाजूंचा युक्तीवाद पाहता, सदर प्रकरणात निकालासाठी खालील मुद्दे निघतात, ते मुद्दे व त्यांचे निष्कर्ष कारणांसहित खालीलप्रमाणे आहेत.

| अ.नं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | सप्टेंबर–२०२३ ते दि.०९.११.२०२४ रोजी पर्यंत वेळोवेळी फिर्यादीचे सासरी म्हाडा कॉलनी, ता.पलूस, | ... **नकारार्थी** |

जि.सांगली येथील राहत्या घरी सर्व आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादी हिचा वारंवार घालून पाडून बोलून, वारंवार मारहाण करुन शारिरीक व मानसिक छळ केला व त्याअन्वये त्यांनी भा.न्या.सं. कलम ८५ सह कलम ३(५) प्रमाणे गुन्हा केला, हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय?

२. उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी सर्व आरोपींनी आपसात संगनमत करून फिर्यादीला गंभीर दुखापत केली व त्याअन्वये त्यांनी भा.न्या.सं. कलम ११७(२) सह कलम ३(५) प्रमाणे गुन्हा केला, हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? ... **नकारार्थी**

३. काय आदेश ? **अंतिम आदेशाप्रमाणे.**

**<u>–कारणमिमांसा–</u>**

**<u>मुद्दा क्र.१ व २ करिता –</u>**

**९.** आरोपींवरील गुन्हा शाबीत करण्यासाठी अभियोग पक्षास आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादी हिचा वारंवार घालून पाडून बोलून, वारंवार मारहाण करुन शारिरीक व मानसिक छळ केला आणि गंभीर दुखापत केली या बाबी सिध्द करावयाचे होते. सदरच्या बाबी सिध्द करण्याच्या दृष्टीने अभियोग पक्षाने साक्षीदार क्र.१ फिर्यादी यांच्या साक्षीवर भिस्त ठेवली. अभियोग पक्षातर्फे या खटल्यातील फिर्यादी साक्षीदार क्र.१ विनया शुभम मोहिते हिने हजर होवून त्यांनी **निशाणी क्र.२७** कडे त्यांची साक्ष नोंदविलेली आहे. सदर फिर्यादीच्या साक्षीचे अवलोकन केले असता असे दिसते की, आरोपी क्र.१ हा तिचा पती असून आरोपी क्र.२ व ३ हे त्याचे नातेवाईक आहेत, दि.१५.०५.२०२३ रोजी फिर्यादीचे आरोपी क्र.१ सोबत सर्व रितीरिवाजाप्रमणे झाले होते, लग्नानंतर ती एकत्रीत कुटूंबात नांदण्यास गेली परंतु काही दिवसांनी तिचे आरोपींसोबत घरगुती कारणावरुन वादावादी

होण्यास सुरुवात झाली त्यामुळे तिने आरोपींविरोधात घरगुती वादावादीतून तक्रार दाखल केली होती. सदर फिर्यादी साक्षीदार अभियोग पक्षाच्या हकीकतीला दुजोरा देत नाही. तिने तिच्या फिर्यादमधील मजकूर माहित नसल्याचे सांगुन तिने फिर्याद व प्रथम खबर अहवालावरील **निशाणी क्र.२८ व २९** कडील फक्त सही मान्य केली आहे. सदर फिर्यादी साक्षीदाराने अभियोग पक्षाच्या कथनेस सहकार्य न केल्यामुळे सदर फिर्यादी साक्षीदाराचा अभियोगपक्षातर्फे उलटतपास घेण्यात आला परंतु, त्यामध्ये देखील अभियोग पक्षाला सहकार्य करणारा पुरावा पटलावर आला नाही.

**१०.** साक्षीदार क्र.१ हिने अभियोग पक्षास पुरक अशी साक्ष न दिल्याने व घटनेबाबत काहीही कथन केले नसल्याने सहाय्यक सरकारी वकीलांनी भारतीय साक्ष कायद्याचे कलम १५४ अन्वये प्रश्न विचारले परंतु आरोपींवरील गुन्हा शाबीत होईल असे कोणतेही कथन पटलावर आले नाही.

**११.** फिर्यादीने अभियोगपक्षाच्या कथनेस सहकार्य होईल असा कोणताही पुरावा सादर केलेला नाही. स्वतः फिर्यादीनेच अभियोगपक्षाच्या कथनेस समर्थन केलेले नाही. अशा परिस्थितीत, फिर्याद व त्यातील अभियोग पक्षाचे कथन ख–या अर्थाने सिध्द झालेले नाही.

**१२.** आरोपींतर्फे फिर्यादीचे वैद्यकीय प्रमाणपत्र **निशाणी क्र.३१** प्रमाणे मान्य करण्यात आला. जरी आरोपींतर्फे फिर्यादीचे वैद्यकीय प्रमाणपत्र **निशाणी क्र.३१** प्रमाणे मान्य करण्यात आला असला तरीही आरोपींनीच आपसात संगनमत करुन फिर्यादी हिचा वारंवार घालून पाडून बोलून, वारंवार मारहाण करुन शारिरीक व मानसिक छळ केला आणि गंभीर दुखापत केली या बाबी सिध्द झाल्याचे ग्राह्य धरता येणार नाही. आरोपींवरील गुन्हा शाबीत करण्याच्या दृष्टीने अभियोग पक्षाने इतर साक्षीदारांची साक्ष पटलावर नोंदविली नाही. तसेच, मुख्यतः फिर्यादी साक्षीदाराने आरोपींसोबत तडजोड झाली असल्याचे मान्य केले आहे. त्यामुळे कदाचित

फिर्यादीस प्रस्तुतचे प्रकरण चालविण्यास स्वारस्य नसल्याचे दिसून येते. त्यामुळे एकंदरित फिर्यादीने अभियोगपक्षाच्या कथनेस सहकार्य होईल असा कोणताही पुरावा सादर केलेला नाही. स्वतः फिर्यादीनेच अभियोगपक्षाच्या कथनेस समर्थन केलेले नाही. अशा परिस्थितीत, फिर्याद व त्यातील अभियोग पक्षाचे कथन ख–या अर्थाने सिध्द झालेले नाही. फिर्यादीने त्याच्या साक्षीपुराव्यादरम्यान प्रस्तुत प्रकरणामध्ये त्याचेमध्ये व आरोपींमध्ये न्यायालयाबाहेर **निशाणी क्र.२६** प्रमाणे तडजोड झाली असल्याचे देखील मान्य केले आहे. तसेच, फिर्यादीने **निशाणी क्र.३०** प्रमाणे पुरसिस देउन त्यांचा तोंडी पुरावा संपला याशिवाय कोणताही पुरावा देणेचा नाही असे सांगितले आहे.

**१३.** आरोपींविरुध्द कोणताही दोषदर्शक असा पुरावा पटलावर आलेला नाही. आरोपींवर ठेवलेले आरोप निःशंखपणे सिध्द करण्याकरिता आवश्यक असणारा सबळ, ठोस व स्वतंत्र असा साक्षीपुरावा अभियोग पक्षातर्फे सादर करण्यात आलेला नाही. कथित घटना व त्यामधील आरोपींचा दोषदर्शक सहभाग निःशंखपणे सिध्द होत नाही. फिर्याद व त्यातील अभियोग पक्षाचे कथन सिध्द झालेले नाही. आरोपींनीच आपसात संगनमत करुन फिर्यादी हिचा वारंवार घालून पाडून बोलून, वारंवार मारहाण करुन शारिरीक व मानसिक छळ केला आणि गंभीर दुखापत केली या बाबी अभियोग पक्षाने निःशंखपणे सिध्द केलेल्या नाहीत. करीता, मी मुद्दा क्र.१ व २ चे उत्तर नकारार्थी नोंदवत आहे.

**<u>मुद्दा क्र.३ करिता –</u>**

**१४.** उपरोक्त चर्चेवरुन व मुद्दा क्र.१ व २ वरील माझ्या नकारार्थी निष्कर्षावरुन असे निष्पन्न होते की, अभियोगपक्षाने आरोपींवर ठेवलेले दोषारोप निःशंखपणे सिध्द केलेले नाहीत. करीता, आरोपी क्र.१ ते ३ हे प्रस्तुत खटल्यातुन निर्दोष सुटण्यास पात्र ठरत आहे. अंततः, मुद्दा क्र.३ चे उत्तरार्थ मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. आरोपी क्र.१ शुभम रामचंद्र मोहिते, क्र.२ रामचंद्र विष्णु मोहिते आणि क्र.३ सौ.वंदना रामचंद्र मोहिते यांची भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम २७१ नुसार भारतीय न्याय संहिता कलम ८५, ११७(२) सह ३(५) अन्वयेच्या गुन्ह्यांमधून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपींचे वैयक्तिक जातमुचलका व बंधपत्र रद्द करणेत येतात.

३. आरोपींनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ कलम ४८१ अंतर्गत वैयक्तिक जातमुचलका व बंधपत्र प्रत्येकी र.रु.१५,०००/- चे न्यायालयात सादर करावे.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत केला)**

**sd/-**

**पलूस.** **(एम.ए.एम.जे. शेख)**

**दिनांक- २७.०३.२०२६.** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,**

**पलूस.**

CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Sou.G.A. Patil (Grade-3) |
| Court | : | M.A.M.J. Shaikh, Civil Judge Junior Division & Judicial Magistrate First Class, Palus, Dist. Sangli. |
| Date | : | 27.03.2026 |
| Judgment signed by the Presiding officer on | : | 27.03.2026 |
| Judgment uploaded on | : | 01.04.2026 |